N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नंदुरबार **P.S.(ठाणे):** नंदुरबार शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0776 **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**26/09/2023 01:44

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्हाची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Date From (दिनांक पासून):** 25/09/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 25/09/2023
**Time From (वेळेपासून):** 16:47 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:51 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 26/09/2023 **Time (वेळ):** 01:44 बजे
(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 005
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 26/09/2023 01:44 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 05 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** जिल्हा परीषद नंदुरबार,मुख्य प्रवेशव्दारा जवळ , नंदुरबार,नंदुरबार, 425412

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): संघरत्न अनिल कुवर

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 2001

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | मुरली मनोहर कलनी मलोणी, मलोणी,नंदुरबार ,नंदुरबार ,नंदुरबार शहर, नंदुरबार,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | मुरली मनोहर कलनी मलोणी,मलोणी ता शहादा,नंदुरबार ,नंदुरबार ,नंदुरबार शहर,नंदुरबार,महाराष्ट्र,425412,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपींचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दिनेश केशवराव पाटील | | | 1. पटेल कलनी,प्लट न 8-ब., दोंडाईचा तालिंदखेडा जिधुळे, दोंडाईचा, दोंडाईचा,धुळे, महाराष्ट्र,भारत-425408 |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/रू दराच्या 39 नोटा. | 19,500.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकुण मुल्य (रू. मध्ये)):

19,500.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):
मी, श्री.संघरत्न अनिल कुवर, वय-22 वर्षे, व्यवसाय- सुशिक्षीत बेरोजगार अभियंता रा.मुरली मनोहर कॉलनी , मलोणी, ता.शहादा जि.नंदुरबार, मो.नं. 9657532469.

समक्ष पोलीस ठाण्यात हजर राहुन फिर्याद लिहुन देतो की, मी वरील ठिकाणी वडील अनिल ओंकार कुवर, आई लता अनिल कुवर अशांसह राहतो. माझे शिक्षण डिप्लोमा सिव्हील इंजिनियरींग पर्यंत झाले असुन, सध्या लोणखेडा कॉलेजला बीटेक (सिव्हील) चे वर्षाचे शिक्षण घेत आहे. मी सुशिक्षीत बेरोजगार अभियंता म्हणुन सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा व जिल्हा परीषद नंदुरबार येथे नोंदणीकृत बांधकाम ठेकेदार म्हणुन काम करीत आहे.

सन 2022 मध्ये ऑक्टोबर 2022 ते डिसेंबर 2022 या कालावधीत माझा मित्र सौरभ पुरुषोत्तम पटेल उर्फ सनी यांच्या सोबत पार्टनरशिप मध्ये लघु पाटबंधारे विभाग, शहादा अंतर्गत आमच्या इतर बांधकाम ठेकेदार मित्रांच्या नावे मंजुर असलेले एकुण तीन कामे पुर्ण केली आहेत. त्यात 1) नदु बामखेडा ता.शहादा येथे नविन सिमेंट नाला बांध तयार करणे, किंमत 9,99,000/- रुपये. 2) अमरपुर क्र. 01 ता.शहादा येथे साठवण बंधारा दुरुस्ती करणे, किंमत 9,99,000/- रुपये 3) अमरपुर क्र.02 ता. शहादा येथे साठवण बंधारा दुरुस्ती करणे किंमत 9,99,000/- रुपये अशा एकुण तिन्ही कामांचे मिळुन 29,97,000/-रुपये एवढ्या रकमेची कामे मंजुर होती. यापैकी 18,98,337 /- रुपये एवढी रक्कम आम्हाला प्रत्यक्षात प्राप्त आहे. मंजुर रकमेतुन म्हणजे 29,97,000/- रुपये रकमेतुन आम्हाला प्राप्त रकमेव्यतीरीक्त जी.एस.टी. ची 10,98,663 /- रुपये एवढी रक्कम कपात झाली आहे. तसेच या व्यतीरीक्त गौणखनिज रॉयल्टीची रक्कम सुध्दा कपात झाली आहे. तसेच तिन्ही कामांच्या मंजुर रकमेतुन आमची अंदाजे 2,40,000/- रुपये एवढी रक्कम अथवा त्यापेक्षा थोडी जास्त रक्कम लघु पाटबंधारे विभाग , जिल्हा परीशद नंदुरबार यांच्या कडे अनामत/डिपॉझिट म्हणुन जमा आहे.

वरील नमुद तिन्ही कामाची एम.बी.रेकॉर्ड करुन 18,98,337 /- रुपये एवढी रक्कम काढुन दिल्या बद्दल श्री.दिनेश पाटील , कनिष्ठ अभियंता, अतिरीक्त कार्यभार उपविभागीय जलसंधारण अधिकारी, लघु पाटबंधारे विभाग, शहादा हे आमच्या कडुन केलेल्या कामाचे बिले काढुन दिल्याचे मोबदल्यात , एकुण बिलाच्या रकमेच्या 5 टक्के प्रमाणे लाचेची मागणी करीत होते. एकुण बिलाच्या रकमेच्या 5 टक्के होणारी एकुण रक्कम 94,916/- रुपये म्हणजे एकुण 95,000/- एवढ्या रकमेची श्री.दिनेश पाटील आमच्या कडुन मागणी करीत होते. श्री.दिनेश पाटील यांना वेळो वेळी आम्ही एकुण 75,000/-रुपये दिले आहेत. त्यात मी माझ्या फोन पे ॲपने त्यांच्या बँक खात्यावर फोन पे ॲपने तीन वेळा यात 1) दिनांक 17/12/2022 रोजी 3,000/-रुपये 2) दिनांक 12/01/2023 रोजी 6,000/-रुपये 3) दिनांक 30/04/2023 रोजी 3,000/- रुपये असे एकुण 12,000/- रुपये श्री.दिनेश पाटील , कनिष्ठ अभियंता , अतिरीक्त कार्यभार उपविभागीय जलसंधारण अधिकारी, लघु पाटबंधारे विभाग, शहादा यांना ऑनलाईन पाठविले आहेत. यानंतरही श्री.दिनेश पाटील, कनिष्ठ अभियंता,अतिरीक्त कार्यभार उपविभागीय जलसंधारण अधिकारी, लघुपाटबंधारे विभाग,शहादा हे माझ्याकडे उर्वरीत रक्कम 20,000/- रुपयांसाठी वारंवार तगादा लावत होते. तसेच "तुम्ही जर मला 20,000/-रुपये दिले नाहीत तर मी तुम्हाला तुमची अनामत रक्कम मिळु देणार नाही." व पुढे कोणतेही नवीन काम तुला मिळु देणार नाही, अशी धमकी मला देत होते.

यानंतर मी अँन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार येथील पोलीस उपअधीक्षक श्री. चौधरी साहेबांशी दि. 18/09/2023 रोजी फोनवर संपर्क करुन शहादा येथे येण्याची विनंती करुन या बाबत तक्रार दिली आहे. यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री.चौधरी साहेब हे दिनांक 18/09/2023 रोजी स्टाफ सह शहादा येथे आले होते. यानंतर



Scanned with CamScanner

पंचांसमक्ष झालेल्या चर्चेअंती व सुचनांनुसार तसेच श्री.दिनेष पाटील , कनिश्ठ अभियंता , अतिरीक्त कार्यभार उपविभागीय जलसंधारण अधिकारी, लघु पाटबंधारे विभाग, षहादा यांनी बोलावल्यानुसार दिनांक दि. 20/09/2023 रोजी नंदुरबार येथे आदर्ष लॉज, नवापुर चौफुली ते धुळे चौफुली बायपास रोड नंदुरबार येथे पंचांसमक्ष लाच मागणी पडताळणी कारवाई करण्यात आली. ज्यात श्री.दिनेष पाटील , कनिश्ठ अभियंता , अतिरीक्त कार्यभार उपविभागीय जलसंधारण अधिकारी, लघु पाटबंधारे विभाग, षहादा यांनी पंच क्रमांक 01 श्री.चेतन चेळके, तलाठी यांच्या समक्ष उर्वरीत 20,000/- रुपये लाचेची रक्कम लवकर देण्या बाबत सांगत असल्याचे व तडजोडीअंती षेवटी 19,500/- रुपये दया पटकन असे म्हणुन लाचेची मागणी केली असल्याचे पंचासमक्ष निश्पन्न झाले आहे. दिनांक 20/09/2023 रोजी या बाबतचा सविस्तर पडताळणी पंचनामा पंचासमक्ष करण्यात आला आहे.

यानंतर श्री.दिनेष पाटील यांनी दिनांक 23/09/2023 रोजी मला व माझ्या वडीलांना फोन करुन सोमवारी दिनांक 25/09/2023 रोजी षहादा येथे भेटु असे सांगीतले होते. त्यानुसार मी , पोलीस उपअधीक्षक श्री.चौधरी साहेब व पंच अश्या सर्वांच्या सर्वानुमते आज दिनांक 25/09/2023 रोजी श्री. दिनेष पाटील , कनिश्ठ अभियंता , अतिरीक्त कार्यभार उपविभागीय जलसंधारण अधिकारी, लघु पाटबंधारे विभाग, षहादा यांना षहादा येथे भेटुन सापळा कारवाई करण्याचे ठरले होते. या नुसार मी , पोलीस उपअधीक्षक श्री.चौधरी साहेब व पंच असे सर्वजण षहादा येथे आज दिनांक 25/09/2023 रोजी दुपारी 12/30 वाजता षहादा येथे उपस्थित असतांना श्री. दिनेष पाटील यांनी नंदुरबार येथे येण्याबाबत सांगितले.

यानुसार मी, पोलीस उपअधीक्षक श्री.चौधरी साहेब व पंच क्रमांक 01 श्री.चेतन चेळके व पंच क्रमांक 02 श्री. दिपक निळे व सापळा पथकातील सर्व पोलीस अंमलदार असे सर्वजण अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय नंदुरबार येथे आलो. पोलीस उपअधीक्षक श्री. राकेष चौधरी साहेब यांनी लोकसेवक श्री.दिनेष पाटील यांनी 19,500/-रु ची लाचेची मागणी केली असल्याने मागणी केल्या प्रमाणे त्यांना देण्यासाठी 19,500/-रुपये हजर करण्यास मला सांगितले. यानंतर मी माझ्या व्यवसायाच्या उत्पन्नातुन बचत केलेले 500/-रुपये दराच्या 39 चलनी नोटा असे एकुण 19,500/-रुपये पोलीस उपअधीक्षक श्री. राकेष चौधरी साहेब व पंच नं 1 श्री.चेळके यांचे समक्ष हजर केले. या ठिकाणी पोलीस उपअधीक्षक श्री. राकेष चौधरी यांच्या सुचनेवरुन पोना/मनोज अहिरे यांनी लाचेच्या सापळ्यात अँन्थ्रासिन पावडर कषी लावली जाते याबाबत व अल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाषात अँन्थ्रासिन पावडरच्या गुणधर्माबाबतचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. तसेच पोलीस उपअधीक्षक श्री.चौधरी यांच्या सुचनेवरुन पोना/संदीप नावाडेकर यांनी एक सोनी कंपनीचा एक डिजीटल व्हाईस रेकॉर्डर व सॅनडिस्क कंपनीचे मायक्रो एस.डी.-32 जी.बी. चे एक नवीन सीलबंद मेमरी कार्ड असे बाहेर काढुन माझे व दोन्ही पंच यांचे समक्ष हजर केले. सदर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर कसे हाताळण्यात येते याची सविस्तर माहिती मला व दोन्ही पंचांना दिली. त्यासोबतच डिजीटल व्हाईस रेकॉर्डर हाताळणीचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री. चौधरी यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालवुन त्यामध्ये पुर्वीचे कसलेही रेकॉर्डींग नसल्याची पंचांची खात्री केली.

यानंतर श्री.दिनेष पाटील यांनी बोलावल्यानुसार जिल्हा परिशद नंदुरबार येथील मुख्य प्रवेषद्वाराजवळ पंच क्रमांक 01 श्री.चेतन चेळके यांच्या सह गेलो असता , श्री.दिनेष पाटील हे पुर्वेकडे तोंड करुन उभे होते. आम्ही त्यांच्या जवळ गेलो व मी त्यांच्या समोर माझ्या पॅन्टच्या उजव्या खिषातील लाचेची रक्कम धरली असता, श्री. दिनेष पाटील यांनी मला टाक असे बोलले. तेव्हा मी त्यांना कोठे टाकु ? असे विचारले असता त्यांनी मला त्यांच्या पॅन्टच्या पुढील बाजुच्या उजव्या खिषात लाचेची रक्कम टाकण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी माझ्या उजव्या हाताने लाचेची रक्कम त्यांच्या पॅन्टच्या पुढील उजव्या खिषात टाकली असता, लोकसेवक श्री. दिनेष पाटील यांनी त्यांच्या उजव्या हाताने सदर लाचेची रक्कम धरुन त्यांच्या खिषात व्यवस्थीत ठेवली.त्यानंतर मी पुर्वनियोजीत ठरलेला इषारा केला असता,सापळा पार्टी मधिल अधिकारी पोलीस उप अधीक्षक श्री. राकेष चौधरी, स्टाफ व पंच न 02 श्री.निळे हे धाऊन तात्काळ सदर ठिकाणी आले. त्यावेळी पोलीस उपअधीक्षक श्री. राकेष चौधरी यांनी श्री. दिनेष पाटील कनिश्ठ अभियंता, अतिरीक्त कार्यभार उपविभागीय जलसंधारण अधिकारी, लघु पाटबंधारे विभाग, षहादा यांना स्विकारलेली लाचेची रक्कम कोठे ठेवली? याबाबत मला विचारले असता, मी सदर लाचेची रक्कम लोकसेवक श्री.दिनेष पाटील यांच्या सांगण्याप्रमाणे त्यांचे पॅन्टचे उजवे बाजुचे खिषात ठेवली असल्याचे सांगितले. तेव्हा पंच नं 1 श्री.चेळके यांना सदर रकमे बाबत खात्री करण्यासाठी पोलीस पोलीस उप अधीक्षक श्री. राकेष चौधरी यांनी सांगितले असता लोकसेवक श्री.दिनेष पाटील कनिश्ठ अभियंता, अतिरीक्त कार्यभार उपविभागीय जलसंधारण अधिकारी, लघु पाटबंधारे विभाग,षहादा यांच्या उजव्या बाजुच्या खिषात लाचेची रक्कम 19,500/-रुपये त्यात 500 रु दराच्या 39 चलनी नोटा मिळुन आल्यात. त्या नोटांची पंच नं 2 श्री. दिपक निळे यांचेमार्फत खात्री केली असता, सापळापुर्व पंचनाम्यातील नोटांचे नंबर व हस्तगत करण्यात आलेली रक्कम ही तंतोतंत जुळुन आली. या



Scanned with CamScanner

बाबत दिनांक 25/09/2023 रोजी सापळापूर्व व यशस्वी सापळा पंचनामा पंच○समक्ष केला आहे.

तरी मी, जिल्हा परीशद लघुपाटबंधारे विभाग, पंचायत समिती, शहादा अंतर्गत केलेल्या 03 कामांचे बिल काढुन दिल्याबद्दल एकुण बिलाचे 5 टक्के प्रमाणे असलेल्या एकुण रक्कमेपैकी उर्वरीत एकुण 20,000/- रुपये○ची मागणी करुन तडजोडीअंती 19,500/- रुपयांची लाचेची मागणी केली. तसेच मागणी केलेली लाचेची रक्कम 19,500/- रुपये आज दिनांक 25/09/2023 रोजी 16/47 ते 16/51 वाजेचे दरम्यान जिल्हा परीशद नंदुरबार कार्यालयाचे मुख्य प्रवेशद्वाराजवळ पंच○समक्ष स्विकारली आहे. म्हणुन माझी श्री.दिनेश के○श्वराव पाटील, कनिष्ठ अभियंता, अतिरीक्त कार्यभार उपविभागीय जलसंधारण अधिकारी, लघु पाटबंधारे विभाग,शहादा रा. दोंडाईचा ता. शिंदखेडा जिल्हा धुळे यांच्या विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरुन अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Ravindra Bhanudas Kalamkar(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
नंदुरबार शहर पो.स्टे

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)



Scanned with CamScanner

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

Name (नाव): Ravindra Bhanudas

Rank (पद): (Inspector)

No. (क्र.):

Attachment to Item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीख/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेहरा के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (चा स्थान): Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Place Of (चा स्थान): Leucoderma (कोड) | Place Of (चा स्थान): Mole (तिळ) | Place Of (चा स्थान): Scar (व्रण) | Place Of (चा स्थान): Tattoo (गोंदण) | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणाऱ्याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त वरील रकान्याची नोंद घेतली जाईल.)



Scanned with CamScanner